**शिक्षणाधिकारी कार्यालय**

(प्राथमिक विभाग)

चेलीपुरा हायस्कूल स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर 431001

जा.क्र.जिपछसं/शिक्षण/प्राथि-3/2024 / 605/451 दिनांक :- 18.01.2024

प्रति,

**अध्यक्ष /सचिव/मुख्याध्यापक,**

**सहारा शिक्षण प्रसारक मंडळ एन-4 सिडको, औरंगाबाद संचलित**

इंद्रगढी प्राथमिक शाळा, घाटनांद्रा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

**विषय :- <u>वैयक्तिक / सेवासातत्य मान्यता मिळणे बाबत.</u>**

**संदर्भ:-** 1.महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी ( सेवाशर्ती) नियम 1981

2.शासन निर्णय क्र पीआरई-2011/प्रक्र 177/ प्राशि-1 दि. 19 मार्च, 2012

3.शासन निर्णय क्र आरटीई-2010/प्रक्र 2010/प्रक्र 572/प्राशि-1 दि. 13 फेब्रुवारी, 2013

4.शासन निर्णय क्र एसएसएन-2015/प्रक्र 20/15 टीएनटी-2 दि.13 जुलै, 2016

5.शासन निर्णय क्र सीईटी-2015/ प्र.क्र. 149/ टीएनटी- 1 दिनांक 20 जून, 2018

6.शासन निर्णय क्र एसएसएन-2015/प्रक्र 20/टिएनटी-1 दिनांक 24.08.2018

7.शासन निर्णय क्र.एसएसएन-1010/(277/10)/माशि-2 दिनांक 15.09.2011

8.आपला प्रस्ताव क्र. 15.01.2024

वरील विषयी संदर्भ क्र.8 अन्वये आपण, सहारा शिक्षण प्रसारक मंडळ एन-4 सिडको, औरंगाबाद संचलित इंद्रगढी प्राथमिक शाळा, घाटनांद्रा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर या शाळेमध्ये संस्थेने नियुक्ती केलेल्या 1) श्रीमती मंदाडे सुप्रिया बालाजी, सहशिक्षक 2) श्रीमती मद्रे अंजली गोंविद, सहशिक्षक 3) श्री. डोंगरे प्रसाद बाळासाहेब, प्राथमिक पदवीधर शिक्षक म्हणुन अशंत:अनुदानित तत्वावर नियुक्ती मान्यतेचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे. संदर्भ क्रमांक 3 वरील शासन निर्णय अन्वये दिनांक 13.02.2013 नंतर सहशिक्षक नियुक्तीसाठी शिक्षक पात्रता परिक्षा (TET/CTET) उत्तीर्ण असणे बंधनकारक असुन (अल्पसंख्यांक व्यवस्थापनाच्या शाळासह) संबधित सहशिक्षक यांची नियुक्ती ही दिनांक 13.02.2013 च्या नंतरची असुन, संदर्भ क्र 02 ते 07 वरील शासन निर्णयानुसार व मुख्याध्यापक यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अधीन राहुन खालील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

| अ .क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | जात | जन्म दिनांक | प्रथम नेमणूक दिनांक | शैक्षणिक पात्रता | हुद्दा/पद | वेतन श्रेणी | विवरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती मंदाडे सुप्रिया बालाजी | इमाव/येलम | 15.06.1992 | 16.06.2022 | H.S.C D.Ed/CTET | सहशिक्षक | एस-10 29200-92300 | श्रीमती मंदाडे सुप्रिया बालाजी या शिक्षक पात्रता परीक्षा (CTET) उत्तीर्ण असल्यामुळे दि. 16.06.2022 ते 15.06.2024 या दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी अशंत: अनुदानित रिक्त पदावर सहशिक्षक म्हणुन नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे. |
| 2 | श्रीमती मद्रे अंजली गोंविद | इमाव/येलम | 15.05.1998 | 18.03.2023 | H.S.C D.EL.Ed/CTET | सहशिक्षक | एस-10 29200-92300 | श्रीमती मद्रे अंजली गोंविद या शिक्षक पात्रता परीक्षा (CTET) उत्तीर्ण असल्यामुळे दि. 18.03.2023 ते 17.03.2025 या दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी अशंत: अनुदानित रिक्त पदावर सहशिक्षक म्हणुन नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे. |

क्र.मा.प

Scanned with CamScanner

| अ .क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | जात | जन्म दिनांक | प्रथम नेमणुक दिनांक | शैक्षणिक पात्रता | हुद्दा/पद | वेतन श्रेणी | विवरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | श्री. डोंगरे प्रसाद बाळासाहेब | मराठा /इ.डब्ल्यू.एस. | 21.04.1998 | 16.08.2023 | B.Sc. Bed/CTET | प्राथमिक पदवीधर शिक्षक | एस-14 38600-122800 | श्री. डोंगरे प्रसाद बाळासाहेब हे शिक्षक पात्रता परीक्षा (CTET) उत्तीर्ण असल्यामुळे दि. 16.08.2023 ते 15.08.2025 या दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी अंशत: अनुदानित रिक्त पदावर प्राथमिक पदवीधर शिक्षक म्हणुन नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे. |

उपरोक्त मान्यता महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) नियम 1981 व कलम (1) मधील तरतुदी नूसार संच मान्यतेच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेली आहे. त्या शिक्षकांना नेमणुकीच्या तारखेपासून शालेय वर्षाअखेर पर्यंत मान्यता दिलेल्या आहेत. ज्या शिक्षकांना नेमणुकीच्या तारखेपासून शालेय वर्षा अखेर पर्यंत मान्यता दिलेले आहे त्या शिक्षकांना वर्षा अखेरीस सेवेतुन कार्यमुक्त करावे. तसेच मान्यता दिलेले शिक्षक धरुन आपल्या शाळेतील शिक्षकांची संख्या या कार्यालयास निश्चित केलेल्या शिक्षक संख्ये पेक्षा जास्त होता कामा नये. वरील नेमणुक मान्यता दिल्यामुळे आपल्या शाळेतील उपरोक्त पात्रतेची कायम शिक्षक अतिरिक्त झालेले आढळुन आल्यास मान्यता रद्द केली जाईल. संबधिताच्या नियुक्तीस व सेवासातत्यास संस्थेने, मुख्याध्यापकाने दिलेल्या कागदी पुराव्याच्या अधारे मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी भविष्यात तफावत अथवा दिलेले कागद पत्रे खोटी तसेच शासन नियमाच्या विरुध्द आढळुन आल्यास व तक्रारी उद्भवल्यास व त्यामध्ये तथ्य निदर्शनास आल्यास सदर मान्यता रद्द करुन संस्था/ मुख्याध्यापक यांचे विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(जयश्री चव्हाण)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर

प्रतिलीपी:-

1. अधीक्षक, भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक(प्राथमिक) छत्रपती संभाजीनगर.
2. संबंधितास, मुख्याध्यापक मार्फत.
3. निवडनस्ती.

Scanned with CamScanner